# पुणे महानगरपालिका
## आयातकर कार्यालय
### Process Manual Format

**विभाग :- गस्तीपथक** **कामाचे नाव :-बिगर जकात वाहन पकडणे**

| टप्पा क्रमांक | पद | करावयाचे काम | आवश्यक कागदपत्रे | कलम/नियम/स्थायी आदेश/परिपत्रक इ. | कामाला लागणारा वेळ |
|---|---|---|---|---|---|
| **Sr.No.** | **Designation** | **Activity Description** | **Required Documents** | **Applied Rule/Section/ Standing Order etc.** | **Time Required** |
| १ | समन्वयक अधिकारी | वेगवेगळ्या गस्तीपथक/भरारीपथक सेवकांच्या नेमणूका करून मा.आयातकर प्रमुख यांचे मान्यतेने त्या त्या सेवकांना बदली आदेश पोचविणे. | | | |
| २ | भरारी इन्स्पेक्टर | भरारी इन्स्पेक्टर यांनी त्यांना नेमूण दिलेल्या जागी, नेमूण दिलेल्या वेळेत आपल्या बरोबर असणाऱ्या सह कर्मचारी (ज्यु.ग्रे.लेखनिक) व मोटार चालक यांच्या बरोबर काटेकोरपणे हजर राहून आपल्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या बिगर जकात मालावर लक्ष ठेवणे. बिगर जकात माल आल्याचे आढळून आल्यास संबंधीत मालाची कागदपत्रे आयातदार अथवा मोटार वाहक यांचेकडून प्राप्त करून घेणे व सदर माल गाडीसह मध्यवर्ती कार्यालय (नवापूल नाका) येथे समन्वय अधिकारी यांना सविस्तर माहितीसह ताब्यात दयावे.<br>आयातदार अथवा वाहन चालक यांनी कागदपत्र देणेस नकार दिला अथवा शिविगाळ,धक्काबुक्की, दमदाटी केल्यास पोलीस नियत्रक कक्षास क्र.१००वर फोन करून पोलीस संरक्षण मागवून घेणे अथवा संबंधित कार्यक्षेत्रातील नजिकच्या पोलीस चौकीमध्ये तक्रार नोंदवून F.I.R दाखल करावा. | | | |

| टप्पा क्रमांक | पद | करावयाचे काम | आवश्यक कागदपत्रे | कलम/नियम/स्थायी आदेश/परिपत्रक इ. | कामाला लागणारा वेळ |
|---|---|---|---|---|---|
| **Sr.No.** | **Designation** | **Activity Description** | **Required Documents** | **Applied Rule/Section/ Standing Order etc.** | **Time Required** |
| ३ | समन्वयव अधिकारी | गस्तीपथक/भरारीपथक यांनी पकडलेले बिगरजकात मालाचे वाहन व कागदपत्रे ताब्यात घेऊन त्याची नोंद आपलेकडील कार्यविवरण रजिस्टरला नोंदवून घेणे.<br>मालाची बिले पाहून त्याप्रमाणे होणारी जकात व अकरापट तडजोड फीचा फॉर्म भरून मा.आयातकर प्रमुख यांचे मान्यतेने रक्कम भरून घेणे व गाडी व माल आयातदार यांचे ताब्यात देणे.<br>आयातदारास जकात व अकरापट तडजोड फी मान्य नसल्यास तो मे.ज्युडिसीयल मॅजिस्ट्रेट (पुणे मनपा कोर्ट) यांचेकडे दावा दाखल करून नि/५ नुसार आदेश घेऊन माल व वाहन सोडणे बाबत मागणी करतो अशा वेळी मे.कोर्ट ऑर्डर प्रमाणे वाहनातील संपूर्ण मालाची तपासणी (असेसमेंट) करून होणारी जकातीची रक्कम वसूल करून माल व वाहन आयातदार यांच्या ताब्यात देऊन ती मिळाल्याची पोच घेणे.<br>सदर कोर्ट ऑर्डर विरूध्द फौजदारी दावा दाखल करणेसाठी माल पकडून आणलेल्या संबंधित इन्स्पेक्टर कडून सदर मालाबाबतच्या घटणेबाबत संपूर्ण माहिती घेऊन अनुषंगीक कागदपत्रासह मा. आयातकर प्रमुख यांचे मान्यतेने फौजदारी खटला दाखल करणे. | | | |
| ४ | आवक बारनिशी | फौजदारी खटला दाखल करणे बाबत मा.आयातकर प्रमुख यांचे मान्यतेची कागदपत्रे आवक करून कोर्ट विभागाकडे पाठविणे. | | | |

| टप्पा क्रमांक | पद | करावयाचे काम | आवश्यक कागदपत्रे | कलम/नियम/स्थायी आदेश/परिपत्रक इ. | कामाला लागणारा वेळ |
|---|---|---|---|---|---|
| Sr.No. | Designation | Activity Description | Required Documents | Applied Rule/Section/ Standing Order etc. | Time Required |
| ५ | कोर्ट विभाग | नि/५ प्रमाणे झालेल्या खटल्या विरूध्द संबंधित आयातदार, वाहन चालक व मे कोर्टाने निकाल दिलेल्या पार्टी विरूध्द मे.ज्युडिसियल कोर्ट, शिवाजीनगर, पुणे येथे फौजदारी दावा करणेसाठी मनपाच्या पॅनेल वरील वकील यांची वकील पत्रावर स्वाक्षरी घेऊन संपूर्ण कागद पत्रांसह खटला दाखल करावा व त्याची नोंद आपल्या रजिस्टरला करून घेणे.सदर दाव्याबाबत वेळोवेळी मे कोर्टाकडून नेमूण देण्यात येणाऱ्या तारखांची नोंद घेणे. सदर बाबत साक्षी पुराव्यासाठी संबंधित फिर्यादी कर्मचारी यांना मे कोर्टाच्या आदेशाप्रमाणे साक्षीसाठी पत्र देऊन/फोन करून म.कोर्टात हजर राहणे बाबत कळविणे. | | | |

**PM-१९**

| शेरा |
| --- |
| **Remarks** |
| |
| |

| शेरा |
| --- |
| **Remarks** |
| |
| |

| शेरा |
| --- |
| **Remarks** |
| |